रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).

दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएस/ पाणी पुरवठा / 571 /२०२१

दिनांक:- 20 MAY 2021

प्रति,

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

**विषय:- संस्थान कनकुरी साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबत ...**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे पुरवठा विभागामार्फत संस्थानचे कनकुरी येथील साठवण तलावातील मासे विक्री करणेकामी दरपत्रके / कोटेशन मागणी करण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशील | मासे पकडण्याचा कालावधी |
|---|---|---|
| ०१ | कनकुरी साठवण तलाव येथील मासे | ३० दिवस |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही धर्मदाय संस्था असल्याने खालील अटी व शर्तीनुसार जास्तीत-जास्त दर सिलबंद पाकीटात **"मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ता.राहाता, जि.अहमदनगर पीन-४२३१०९" या पत्यावर **दि:०७/०६/२०२१ अखेर सायं ५.०० वाजेपर्यंत** आवक विभागात जमा करावेत. पाकीटावर **"संस्थान कनकुरी साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबत कोटेशन"** असा वरील बाजूस स्पष्ट उल्लेख असावा.

**अटी व शर्ती:-**

१. संस्थानचे कनकुरी येथील तलावातील मासे पकडणेसाठी नेमून दिलेल्या कालावधीत मासे पकडावयाचे आहेत.
२. ज्या कोटेशनधारकाचे दर सर्वात जास्त असतील त्यास मान्यता देण्यात येईल.
३. मासे पकडण्याचे काम स्वत:चे साहित्यासह स्वत:चे व्यक्तींकडून करावयाचे आहे.
४. मासे पकडतांना कोणताही अपघात झाल्यास त्याची जबाबदारी संस्थानवर राहणार नाही.
५. मासे पकडलेनंतर संस्थानमार्फत लहान-मोठे (सर्व जातीचे मासे) सर्वच मासे यांचे एकत्रित वजन केले जाईल. तसेच वजनात कुठल्याही प्रकारची सुट दिली जाणार नाही. मास्यांची एकत्रित वजनाप्रमाणे होणारी मंजूर दराने रक्कम त्वरीत द्यावी लागेल. त्याशिवाय आपणास मालाचा ताबा दिला जाणार नाही.
६. ज्या व्यक्तींचा टेंडरशी संबंध नाही अशा व्यक्तींना साठवण तलावावर येता येणार नाही.
७. संस्थानचे साठवण तलावावर किंवा संस्थान परिसरात मासे विक्री करता येणार नाही.
८. साठवण तलावावर मासे पकडतांना काही वाद झाल्यास किंवा काही गैरप्रकार आढळुन आल्यास आपले टेंडर रद्द करण्याचे अधिकार संस्थानकडे राहतील.
९. मासे पकडतांना मासे मारण्यासाठी कुठल्याही प्रकाचे केमिकल्सचा वापर करता येणार नाही/ अथवा पाण्यात कोणतेही केमिकल टाकता येणार नाही.
१०. सदरची टेंडरसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास तो राहाता न्यायकक्षेत राहील.

कळावे,

"श्री साईबाबांचे शुभाशिर्वादासह"

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४
दुरध्वनी : +९१-२२-२४१६६५५६ फॅक्स : +९१-२२-२४१५०७९८. टेलिग्राम - साईनिकेतन, मुंबई.
• Website : http://www.shrisaibabasansthan.org / www.sai.org.in • Email : saibaba@sai.org.in

WATER SUPPLY/TENDER GENERAL FILES-2020/107